# ग्रामस्थ व ग्रामसेवकामध्ये धुमश्चक्री

## रोजगार सेवकाच्या निवडीवरुनचा वाद गेला विकोपाला ■ चिखलदरा पंचायत समिती समोरील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.९ )** – चिखलदरा तालुक्यातील एका ग्रामपंचायतचे ग्रामसेवक व नागरिक यांच्यामध्ये रोजगार सेवक निवडीवरून झालेल्या वादातून ग्रामस्थ व ग्रामसेवकामध्ये धुमश्चक्री झाली. हा प्रकार सोमवारी( दि.९ ) येथील पंचायत समितीसमोर घडला. यावेळी बघ्यांनी प्रचंड गर्दी केली होती.



गटविकास अधिकारी यांनी चिखलदरा पंचायत समिती येथे ग्रामसेवकांची सभा आयोजित केली होती. त्यामुळे सर्वच ग्रामसेवक सुद्धा या बैठकीमध्ये उपस्थित होते. चिखलदरा तालुक्यातील एका ग्रामपंचायतमध्ये ग्रामसेवक व गावकऱ्यांमध्ये रोजगार सेवक निवडीवरून वाद सुरु होता. या संदर्भात 6 डिसेंबर रोजी चिखलदरा पोलीस स्टेशनला तक्रार सुद्धा करण्यात आली आहे. आज पंचायतीसमोर ग्रामसेवक व गावकरी पुन्हा एकदा समोरासमोर आले.

### दगफेकीनंतर चालल्या लाथा बुक्क्या

पंचायत समितीसमोर सुरुवातीला बाचाबाची सुरु असताना अचानक ग्रामसेवक व गावकऱ्यांनी एकमेकांवर दगडफेक केली. त्यानंतर एकमेकांना लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण करणे सुरु केले. ही हाणामारी ग्रामसेवक तथा पंचायत समितीचे अधिकारी व पदाधिकाऱ्यांमध्ये चर्चेचा विषय ठरला. बातमी लिहेस्तोवर पोलीस स्टेशनमध्ये याप्रकरणी कुठलीही कारवाई झाली नव्हती.

# मी राजीनामा द्यायला तयार, फक्त ही अट नवनीत राणांनी पुर्ण करावी !

## ■ खासदार बळवंत वानखडे यांनी स्वीकारले आव्हान
## ■ ईव्हिएम आणि बॅलेटवरून अमरावतीत राजकारण तापले

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.९ )** – महाविकास आघाडीला ईव्हीएम वर शंका असेल तर अमरावतीच्या खासदारांनी राजीनामा द्यावा आणि बॅलेट वर निवडणूक लढवावी,असे आव्हान भाजप नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांनी दिले होते. ते आव्हान अमरावतीचे काँग्रेस खासदार बळवंत वानखडे यांनी सोमवारी स्वीकारले आहे. मात्र त्यांनी हे आव्हान स्वीकारताना एक अट देखील टाकली आहे. नवनीत राणा यांनी निवडणूक आयोगाकडून लोकसभेची पोटनिवडणूक ही बॅलेट पेपरवर घेण्यात येईल,असे लेखी पत्र आणून द्यावे. त्यानंतर आपण कधीही राजीनामा द्यायला तयार आहोत,अशी अट खासदार बळवंत वानखडे यांनी टाकली आहे. सोमवारी बळवंत वानखडे यांनी एक व्हिडिओ जारी करून त्यामध्ये नवनीत राणा यांचे चॅलेंज आपण स्वीकारत आहोत असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता नवनीत राणा निवडणूक आयोगाकडून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याचे लेखी पत्र बळवंत वानखडे यांना आणून देतात का,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





### काय म्हणाले बळवंत वानखडे

भाजप नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी दिलेलं राजीनामा देण्याचं आव्हान मी स्वीकारतो. मात्र त्यांनी आधी मला निवडणूक आयोगाकडून लोकसभेची पोटनिवडणूक ही बॅलेट पेपरवर घेण्यात येईल,असे लेखी पत्र आणून द्यावे. मी त्यानंतर कधीही,केव्हाही राजीनामा द्यायला तयार आहे. माझी ही केवळ एकच अट आहे. ती अट नवनीत राणा निवडणूक आयोगाकडून पूर्ण करून आणत असतील तर मी राजीनामा द्यायला तयार आहे असे, खासदार बळवंत वानखडे आपल्या प्रतिक्रियेत म्हणाले आहेत.

### नवनीत राणांनी दिले होते हे आव्हान

महाविकास आघाडीला ईव्हीएमवर ऑब्जेक्शन असेल तर अमरावतीच्या काँग्रेस खासदारांनी राजीनामा द्यावा,बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवी राणा देखील राजीनामा देतील. दोन्ही ठिकाणी बॅलेट वर मतदान घेण्यात यावे, असे आव्हान माजी खासदार तथा भाजप नेत्या नवनीत राणा यांनी रविवारी( दि.8) दिलं होतं. लोकसभेत महाविकास आघाडीच्या चांगल्या सीट्स निवडून आल्या त्यावेळेस ईव्हीएम बरोबर होते. तेव्हा लोकशाही जिवंत होती. लोकसभेच्या वेळेस निकाल लागल्यावर आम्ही त्यावर ऑब्जेक्शन घेण्यासाठी कोणीही बाहेर निघालो नाही. आम्ही संविधान मानणारे आहोत.आता विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर महाविकास आघाडीला ईव्हीएम वर शंका येत असेल तर अमरावतीच्या खासदारांनी राजीनामा द्यावा, आमचे बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवी राणादेखील राजीनामा देतील. एकदाचं बॅलेट वर मतदान होऊन जाऊ द्या, असेही नवनीत राणा म्हणाल्या होत्या.

# आज सकल हिंदू समाजाचा मोर्चा

## बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात निषेध

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.९ )**– बांगलादेशातील हिंदू संतांना तेथील सरकारने अटक करून अत्याचार करण्याचे षडयंत्र मोठ्या प्रमाणात सुरू केलेले आहे. बांगलादेशमध्ये सामान्य हिंदूंवर सुद्धा सातत्याने अत्याचार होत आहे. बांगलादेश आता इस्लामी कट्टरतावाद वेगाने सरकत आहे. या सर्व घटनांचा निषेध करण्यासाठी सकल हिंदू समाजाच्यावतीने 10 डिसेंबरला सकाळी 10 वाजता धामणगाव रेल्वे येथे भव्य मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात येणार आहे. बांग्लादेशातील घटनेचा विरोध करण्याकरिता व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने दुपारी 12 वाजेपर्यंत निषेध म्हणून बंद ठेवाव्यात असे आवाहन सुद्धा सकल हिंदू समाजातील कार्यकर्त्यांनी केले आहे. बांगलादेशात सध्या सत्तेवर असलेले मोहम्मद गुनूस हे उच्चशिक्षित तर आहेतच पण त्यांना शांततेचे नोबेलही मिळाले आहे. हिंदूच्या कत्तली करण्यासाठी मोहम्मद युनुस यांना शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले आहे का? ते सत्तेत आल्यापासून बांगलादेशात हिंदूवर सातत्याने हल्ले होत आहेत. भारतात हिंदुत्ववादी सरकार आहे म्हणून हिंदू सुरक्षित आहेत. त्यामुळे बांगलादेशातील हिंदू संतांच्या सुटकेसाठी केंद्र सरकारने बांगलादेश सरकारवर दबाव टाकण्याची गरज आहे. याची जाणीव सरकारला करून देण्यासाठीच सकल हिंदू समाजातर्फे मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चात संपूर्ण सकल हिंदू समाज सहभागी होणार आहे.

# घोडदेव येथील जिल्हा परिषद शाळेत चोरी

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड,( दि.९ )** – येथून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या घोडदेव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चोरी झाल्याची घटना सोमवार ( दि.९ ) ला उघडकीस आली.



अज्ञात चोरट्यांनी शाळेच्या वर्गखोलीचे कुलूप तोडून शाळेतील इंटेक्स स्मार्ट टीव्ही, वॉल घड्याळ, शालेय पोषण आहारातील तेल, वाटाणा असे साहित्य लंपास केले. सकाळी गावातील नागरिक विनोद युवनाते (सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती) शाळेच्या परिसरातून फिरतांना त्यांना शाळेतील एका वर्गखोलीचे गेट उघड्या अवस्थेत आढळले. कुलूप गायब झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांना शाळेत चोरी झाल्याचा संशय आला. त्यांनी लगेच शाळेतील मदतनीस यांना कळविले. मदतनीस ने शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र घाटोळ यांना माहिती दिली. शाळेच्या मुख्याध्यपकांनी शाळेतील सर्व वस्तूंची पाहणी केली असता शाळेला ग्रामपंचायत डोंगरयावली मार्फत मिळालेली इंटेक्स स्मार्ट टीव्ही, घड्याळ, शालेय पोषण आहारात मिळालेले साहित्य वाटाणा, खाद्यतेल इत्यादी साहित्य चोरट्यांनी लंपास केल्याचे निदर्शनास आले. अंदाजे 35 ते 40 हजाराचे साहित्य लंपास झाल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे 6 महिन्या अगोदर याच शाळेत जून महिन्यात चोरी झाली होती. तेव्हा सुद्धा शाळेतून गॅस शेगडी, सिलिंडर चोरीला गेले होते.

# झाडावर धडकली शिवशाहीचा

## सुदैवाने सर्व प्रवासी सुखरूप

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.९ )** – अमरावतीहून यवतमाळकडे जाणारी एमएच 09 ईएम 1629 क्रमांकाची शिवशाही बस रविवारी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास रस्त्याच्या कडेला बाभळीच्या झाडाला धडकली. अमरावती – यवतमाळ मार्गावर सावंगा फाट्यानजीक हा अपघात घडला. चालक मनोहर खासबागे व वाहक छाया इंगोले हे किरकोळ जखमी झाले. बसमध्ये दोन प्रवासी होते. ते सुखरूप असल्याचे एसटी महा मंडळाच्या कार्यालयातील विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच अमरावती येथून एसटी विभागीय कार्यालयातील यंत्र अभियंता (चालन) स्वप्निल धनाड, विभागीय वाहतूक अधीक्षक योगेश ठाकरे व पंकज दांदरे हे घटनास्थळी दाखल झाली होते.



# हा धर्म समन्वय कर्ता विरळा संत...! - ह.भ.प. नयना बच्चू कडू

## गीता जयंती महोत्सवाला भाविकांची अलोट गर्दी

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार( दि.९ )** – वयाच्या नवव्या महिन्यातच अंधत्व आल्यानंतर सुद्धा संपूर्ण जगाचा अभ्यास असणारे गुलाबराव महाराज हे असामान्य आणि अलौकिक संत होते. विसाव्या शतकातील संत श्री.गुलाबराव महाराज केवळ 34 वर्षे आपले आयुष्य जगले आणि त्यांनी आपल्या 34 वर्षांच्या कारकिर्दीत 134 ग्रंथ लिहिले जे आजच्या जीवनशैलित अत्यंत महत्वाचे आहे. आजच्या पिढीसाठी उत्तम डोळस उदाहरण देखील आहे. परमेश्वराच्या या अवताराने आपल्या जिल्ह्यात जन्म घ्यावा यापेक्षा आपले मोठे भाग्य नाही असे अमूल्य विचार ह.भ.प नयना बच्चू कडू यांनी व्यक्त केले. संत श्री गुलाबराब महाराज सेवा संस्थांन बोराळा यांच्या वतीने आयोजित गीता जयंती महोत्सवात गुलाब गौरव कथेच्या माध्यमातून त्या महाराजांच्या कथे बद्दल आपला विचार व्यक्त करत होत्या.

5 डिसेंबर ते 12 डिसेंबर दरम्यान भक्तीधाम चांदुर बाजार येथे गीता जयंती महोत्सव आयोजित करण्यात आला असून दुपारी 2 ते 5 दरम्यान ह.भ.प. नयना कडू या गुलाब गौरव कथेच्या माध्यमातून संत गुलाबराव महाराज यांचे आध्यत्मिक व विज्ञानवादी विचार मांडत आहेत.हभप नयना कडू यांनी संत गुलाबराब महाराज यांच्यावर पीएचडी केलेली असून गुलाबराव महाराज यांचे जन्म ठिकाणापासून तर ज्या ज्या ठिकाणी महाराजांचे वास्तव्य राहले आहे अश्या अनेक राज्यातील त्या त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष संदर्भ त्यांनी घेतलेले आहेत.

पुढे त्या म्हणाल्या की, आपण कल्ना करु शकणार नाही की एक आंधळी व्याक्तीी एवढी पुस्त के लिहु शकतो,तेही वेगवेगळया विषयावर जसे ध्या न, योग, उपनिषद् , ब्रम्हासुत्र , थियोसोफी शास्त्रत कठीणातले कठीण असे विषय त्यांभना समजले. ज्याीचे खुप शिक्षण झाले आणी जे अत्यं्त हुशार आहेत,



त्यांिना सुध्दु असे विषयावर लिखाण केले नसेल. त्युंना शास्त्रा चा अभ्याोस करण्यारस वेळ कधी मिळायचा? संस्कृयत भाषेचे ज्ञान त्यांनी कसे मिळविले? त्यांची लिहीण्या?ची वैदीक पध्दत त्यां नी कशी अवगत केली? हे सर्व प्रश्न आपल्यो मन – बुध्दीला पडतात जेव्हाच त्यांधचे जीवन चरित्र आपण वाचतो.

गुलाबराव महाराज स्वतऱ्ला ज्ञानेशकन्या आणी भगवान श्रीकृष्णाहची पत्नी् मानायचे. 1901मध्ये श्री ज्ञानेर्श्वर महाराज यांचा प्रत्यक्ष अनुग्रह व 1905 मध्ये भगवान श्रीकृष्णाचा रासलीला अधिकार श्री महाराजांनी प्राप्त केला. 1902 मध्ये ते 21 वर्षाचे होते तेव्हाी त्यांनी डार्वीन आणी स्पेशनसरच्याज तत्वाज्ञानावर खंडन मांडणं करणारे विचार प्रगट केले जे आजची आपणास विचार करायला भाग पाडतात. त्यां्नी वेगवेगळया विषयावर पुस्तेके लिहीली जसे ध्यासन, योग आणि भक्तीत. त्यांनी ' मानसायुर्वेद ' नावाचे पुस्तक लिहीले ज्या,त शास्त्रीयदृष्टहया आयुर्वेदाची माहीती लिहीली असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले. श्री गुलाबराव महाराज यांच्या अनेक ग्रंथांचा समीक्षात्मक विवरण करता पूर्णत: त्या सर्व सूत्रांचा मार्मिक आणि उदाहरणासह विवेचन आदरणीय ताई करत आहेत. श्री गुलाबराव महाराजांचे चरित्र आणि त्यांच्या साहित्याचा पुरेपूर अभ्यास असून सुद्धा श्री महाराजांवरती ज्यांची पूर्ण निष्ठा आहे त्यांच्याजवळ श्री महाराजांच्या अनेक अनुभूती प्रचितीला येतात असे त्यांचे ठाम मत आहे.संत गुलाबराव महाराज यांचा भक्त परिवार अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात व राज्याबाहेर देखील आहे.

गीता जयंती महोत्सवाला दूरवरून भाविक भक्त आले असून गुलाब गौरव कथा ऐकण्यासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली आहे. ह.भ.प.नयना बच्चू कडू यांनी संत गुलाबराव महाराज यांचे अनेक संदर्भ आणि त्यांच्यामधील अध्यात्म सोप्या भाषेत भाविकांसमोर मांडले.भाविकांना माहीत नसणाऱ्या काही अध्यात्मिक बाबींचा देखील उलगडा यावेळी ह.भ.प.नयना कडू यांनी केला. यावेळी पंचक्रोशीतील असंख्य भाविक भक्त गुलाब गौरव कथा श्रवण करण्यासाठी उपस्थित होत आहे.


Kausalya Shrungare Education Foundation's

**Vidyaniketan College of Pharmacy**
**Anjangaon Surji**

**(Approved by PCI, DTE & MSBTE)**

**ADMISSION NOTICE (D. PHARM.) 2024-25**

Applications are invited from the eligible candidates for the admission to D. Pharm. first year course against the vacant seats (Against CAP quota) after CAP rounds. Eligibility: As per the norms prescribed by DTE & Government of Maharashtra.

First Year Diploma in Pharmacy (D. Pharm.)

**Admission Schedule 2024-25**

| Sr. No. | Activity | Date |
|---|---|---|
| 1 | Sale & Receipt of Application Form | 11/12/2024 (5.00 pm) |
| 2 | Display of Provisional Merit list | 12/12/2024 (11.00 am) |
| 3 | Submission of Grievance ( If Any) | 12/12/2024 (3.00 pm) |
| 4 | Display of Final Merit list | 12/12/2024 (5.00 pm) |
| 5 | Admission Confirmation | 13/12/2024 (5.00 pm) |

**Contact**
**935884547, 9665811933, 973046087** **Principal**


# चौथ्या माळ्यावरुन उडी घेऊन महिलेची आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.९ )** – एका महिलेने अपार्टमेंटच्या चौथ्या माळ्यावरील फ्लॅटच्या गॅलरीतून उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना 8 डिसेंबर रोजी रात्री खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पार्वतीनगर उघडकीस आली. आरती ऋषिकेश चौधरी (27, रा. पार्वतीनगर) असे मृतक महिलेचे नाव असल्याचे खोलापुरी गेटपोलिसांनी सांगितले. आरती ही आपल्या कुटुंबासह पार्वतीनगर येथील एका अपार्टमेंटमध्ये चौथ्या माळ्यावर राहत होत्या. रविवारी मध्यरात्रीनंतर त्यांनी आपल्या फ्लॅटच्या गॅलरीतून उडी घेतली. त्या थेट खाली उभ्या असलेल्या चारचाकी वाहनावर कोसळल्या. त्यामुळे मोठा आवाज झाला. हा प्रकार आरती यांच्या पतीच्या लक्षात आल्यावर त्यांनी अपार्टमेंटमधील रहिवाशांच्या मदतीने त्यांना तातडीने एका खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचारादरम्यान आरती यांचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळाल्यावर खोलापुरी गेट पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. या प्रकरणी मृत आरती यांच्या पतीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, अर्जदार अफसर बेगम मो शाकीर रा बाभळी ता. दर्यापुर जि. अमरावती येथील रहीवाशी आहे. त्यांनी त्यांचे स्वताच्या जन्माची नोंद न.प. कार्यालय दर्यापूर येथील रजीस्टर मध्ये जन्म नोंद नसल्याने त्यांनी जन्म / मृत्यु अधिनियम 1966 चे कलम 13 (3) अन्वये जन्म नोंद आदेश होण्याकरीता दिनांक-3/06/2024 रोजी विनंती अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरुन जाहिरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. अर्जदार अफसर बेगम मो शाकीर रा बाभळी ता. दर्यापुर जि. अमरावती येथील रहीवाशी आहे. यांचा जन्म दिनांक 03/05/1990 रोजी मौजा बाभळी ता. दर्यापुर. जि. अमरावती येथे झाला आहे. न.प. कार्यालय दर्यापूर येथे नोद घेण्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास अथवा प्रकरणात काही म्हणावयाचे असेल तर त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसाच्या आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा 15 दिवसा नंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

नायब तहसिलदार
दर्यापूर

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार मोहम्मद शाकीर मोहम्मद जाफर रा बाभळी ता.दर्यापूर येथील रहीवाशी आहे. यांचा जन्म दि 08.08.1959 रोजी बाभळी येथे झाला असून सदरची नोंद न.प. कार्यालय दर्यापूर येथील रजीस्टर मध्ये नसल्याने त्यांनी जन्म / मृत्यु अधिनियम 1966 चे कलम 13 (3) अन्वये जन्म नोंद आदेश होण्याकरीता दिनांक 04/06/2024 रोजी विनंती अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरुन जाहिरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. अर्जदार मोहम्मद शाकीर मोहम्मद जाफर रा बाभळी ता.दर्यापूर येथील रहीवाशी आहे. यांचा जन्म दि 08.08.1959 रोजी बाभळी येथे झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा 15 दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

नायब तहसीलदार
दर्यापूर

## जाहिरनामा

खालील तपशिलात निर्दीष्ट जमीन मौजा चंद्रपूर ता. दर्यापूर येथील भुमापण क्रमांक व उपविभाग ९५ मध्ये किरकोळ विक्रीकरीता पेट्रोल पंपसुरू करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज सादर केला आहे. अर्जीत शेतामध्ये (वाणीज्य प्रयोजनाकरीता) उप प्रबंधक सामान्य) इंडियन ऑईल कीरकोळ पेट्रोल पंपसुरू करण्यासाठी परवानगी मिळणे बाबत विनंती केली आहे. या बाबत कोणाचीही हरकत/आक्षेप असल्यास त्यांनीहा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून दि. २०/१२/२०२४ रोजी पर्यंत आपले लेखी अर्ज/आक्षेप वरील कार्यालयास सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा/आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही.

सदर्हू जाहिरनामा आज दि. ०५/१२/२०२४ ला माझ्या सही व शिक्क्यानिशी काढण्यात आला.

| मौजा | नझुल शिट क्र. | सर्व्हे क्रमांक गट क्रमांक | एकुण क्षेत्रफळ हे.आर./चौ.मि. | अर्जीत हे.आर/चौ.मि. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| चंद्रपूर | – | ९५ | १७५० चौ.मी. | १७५० चौ.मी | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड |

शिक्का

उपविभागीय अधिकारी
दर्यापूर

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# श्रीसंत अच्युत महाराजांच्या कलश पदयात्रेने निनादला परिसर

## गुरुकुंज मोझरी, तिवसा, शेंदूरजना बाजारपर्यंत पदयात्रा ■ भक्तिरसात तल्लीन झाले हजारो भाविकभक्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 9) -** श्रीक्षेत्र शेंदूरजना बाजार येथील गुरुमाऊली श्रीसंत अच्युत महाराज यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 8 डिसेंबर रोजी गुरुकुंज आश्रम येथून काढण्यात आलेल्या कलश पदयात्रेने संपूर्ण परिसर भक्तिरसाने निनादून गेला.





गुरुमाऊली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज आश्रम येथील महासमाधीचे पूजन करून तेथून पायदळ कलश यात्रा तिवसा शहर व नंतर पुण्यभूमी शेंदूरजना बाजारपर्यंत निघाली होती. तेव्हा ती ढोल-ताशे, टाळ-मृदंग, ठिकठिकाणी पुष्प वर्षावाने भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. 8 डिसेंबर रोजी श्रीसंत अच्युत महाराज यांच्या जन्मशताब्दी 'श्री' चे महासमाधीस अभिषेक करून प्रारंभ झाला. त्यानंतर साडेपाच ते साडेसहा वाजता ध्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी संतसेवक देविदास महाराज यांनी चिंतन प्रकट केले.

सकाळी 9 वाजता श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम येथून अच्युत महाराज यांच्या जन्मशताब्दी निमित्त कलश यात्रा निघाली. तेव्हा कलश यात्रेचे पूजन व जेसीबीच्या साहाय्याने पुष्पवर्षाव करण्यात आला. गुरुकुंज आश्रम येथून तिवसा येथे पोहचलेली कलश पदयात्रा गुरुग्राम शेंदुरजना बाजारकडे जात असताना तिवसा पेट्रोलपंप चौकात दिंडी - मिरवणुकीची शिस्तबद्ध मोठी रांग निर्माण झाली होती. तेव्हा जेसीबीच्या साहाय्याने या अच्युत महाराजांच्या चरण पादुका रथावर, महाराजांसह तुकडोजी महाराज, श्रीदत्त महाराजांच्या प्रतिमा रथावर तसेच मिरवणुकीतील सहभागी भक्तांवर पुष्प वर्षाव करून स्वागत करण्यात आले. राष्ट्रसंतांच्या महासमाधीचे पूजन डॉ. अनिल सावरकर जनार्दनपंत बोथे



यांच्याहस्ते करण्यात आले. त्यानंतर महाआरती होऊन ही कलश पदयात्रा तिवसाकडे रवाना झाली. गुरुकुंज धाम, तिवसा व गुरुग्राम शेंदूरजना बाजारपर्यत जवळपास 11 किलोमीटर अंतर निघालेल्या या पदयात्रेत अनेक महिला, पुरुष व बालगोपाल भक्तगण तल्लीन झाले होते.

### भव्य-दिव्य भक्तिमय वातावरणाचे अनेकांना दर्शन

टाळ-मृदंगाच्या व ढोल-ताशांच्या गजरात विविध प्रकारची भजने, भक्तिगीते म्हणत ही पदयात्रा दुपारी 1 वाजता गुरुग्राम शेंदूरजना बाजार येथे पोहचली. ठिकठिकाणी संत अच्युत महाराजांच्या चरण पादुकांचे पूजन करण्यात आले होते. तिवसा शहरातील पंचवटी चौक ते पेट्रोलपंप चौक ते पुन्हा पंचवटी चौक अशी भ्रमण करीत निघालेल्या

पदयात्रेतील भव्य-दिव्य भक्तिमय वातावरणाचे अनेकांनी दर्शन घेतले.

# बडनेरामध्ये जलवाहिनी फोडण्याचा प्रयत्न

## ■पाणी टंचाईमुळे मीलचाळ वासीयांमध्ये रोष
## ■जीवन प्राधिकरणाला एका दिवसाचा अल्टिमेटम

**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा, (दि.9)-** गेल्या काही वर्षांपासून अनियमित व अपूऱ्या पाणीपूरवठ्याचा सामना करुन त्रस्त झालेल्या बडनेरा शहरातील मिलचाळवासीयांच्या संतापाचा आज उद्रेक झाला. परिसरातील रहिवासी शेकडो महिला-पुरुषांनी रस्त्यावर उतरुन महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या ढिसाळ कारभाराविरोधात निदर्शने करताना या भागातील जलवाहिनी फोडण्याचा प्रयत्न केला.



काही जनप्रतिनिधी व ज्येष्ठ नागरिकांच्या पुढाकारामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र यावेळी मिलचाळ भागातील पाणीपुरवठा सुरळित करण्यासाठी नागरिकांनी जीवन प्राधीकरणाला एका दिवसाची मुदत दिली आहे; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. पाणी टंचाईमुळे मीलचाळ वासीयांच्या संतापाचा उद्रेक झाला आहे. गेल्या काही वर्षांपासून बडनेरा नवीवस्ती परिसरात असलेल्या मिलचाळ भागात पाण्याची कृत्रिम समस्या निर्माण झाली आहे. काही भागात भरमसाठ पाणी पूरवठा केला जातो. तर बहुतांश भागात रहिवाशांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते, असे चित्र आहे. नविन जलवाहिनी टाकूनही पाण्याचे संकट कायम आहे. वेळप्रसंगी हातपंपाचे दुषित पाणी पिण्याची वेळ नागरिकांवर येते. त्यामुळे येथील सार्वजनिक आरोग्यही धोक्यात आले आहे. मीलचाळच्या रहिवाशांनी याबाबत अनेकदा संबंधित अधिकारी आणि जनप्रतिनिधींकडे तक्रारी केल्या. मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नसून समस्या कायम आहे. हा जीवन प्राधीकरणाच्या स्थानिक प्रशासनाचा ढिसाळ कारभार व संबंधित जनप्रतिनिधींची उदासिनता या समस्येसाठी कारणीभूत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

### मजीप्राच्या अधिकार्यांसोबत भ्रमणध्वनीद्वारे संपर्क

पाण्याच्या समस्येमुळे त्रस्त असलेल्या मिलचाळच्या रहिवाशियांनी रस्त्यावर उतरुन जीवन प्राधीकरणाविरोधात तीव्र निदर्शने केली. महिला-पुरुषांनी या भागातील जलवाहिनी फोडण्याचा प्रयत्न केला. यावेळी शहरातील काही जनप्रतिनिधी आणि ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी मिलचाळ येथे पोहोचून नागरिकांची समजूत काढली आणि त्यांना जलवाहिनी फोडण्यापासून रोखले. यावेळी जीवन प्राधीकरणाच्या अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून वस्तूस्थिती लक्षात आणून देण्यात आली. एक दिवसाची मुदत देवून मिलचाळ परिसरातील पाणीपुरवठा सुरळित न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती प्रकाश बनसोड, प्रहारचे उमेश मेश्राम उपस्थित होते.

# माणिकपूर रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करा!

## गोपाल नांदुरकर यांचा आंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.9)-** विधानसभा निवडणुकीच्या अगोदर बेनोडा शहीद पंचायत समिती अंतर्गत वरुड ते मोर्शी या राष्ट्रीय महामार्गाला लागून असलेल्या माणिकपूर रस्त्याचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्यामुळे ये जा करणाऱ्या नागरिकांना तसेच आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना याचा जबर फटका बसत आहे. त्यामुळे रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्याकरिता बेनोडा शहीदचे माजी उपसरपंच गोपाल नांदुरकर यांनी प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे.

मागील काही वर्षापासून बेनोडा शहीद पंचायत समिती अंतर्गत येणारे संपूर्ण रस्ते पूर्ण करा या मागणीसाठी गोपाल नांदुरकर यांनी अनेक वेळा प्रशासना विरोधात आंदोलने केलीत, या आंदोलनाची दखल उशिरा का होईना प्रशासनाने घेतली व निवडणुकीच्या अगोदर रस्त्याच्या कामाला सुरुवात केली. परंतु विधानसभेच्या निवडणुका संपल्यानंतर रस्त्याचे काम अपूर्ण राहिलेले आहे. ते पूर्ण का करण्यात आले नाही. विद्यार्थी व ये -जा करणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होत आहे. 26 तारखेच्या आत रस्ता पूर्ण झाला नाही तर त्याच दिवशी बेनोडा बसस्थानकासमोर ठिय्या आंदोलन व चक्काजाम आंदोलन करण्यात येईल असा इशारा वरुडचे उपविभागीय अभियंता यांना नांदुरकर यांनी दिलेल्या निवेदनात केला आहे.

# दिगांबरराव कुबडे यांचे निधन



**चांदूर रेल्वे -** स्थानिक वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य, संताबाई यादव मंगल कार्यालयाचे व्यवस्थापक, माळीपुरा परिसरातील रहिवासी दिगांबरराव विठ्ठलराव कुबडे यांचे वयाच्या 80 व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने सोमवारी पहाटे 5.45 ला निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले. अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे असल्याने त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्यामागे पत्नी, चार मुली, सुन, नातवंडासह बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# विभागीय लोकशाही दिनात 13 प्रकरणांवर सुनावणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.9) -** नागरिकांकडून प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही होणे आवश्यक आहे. विभागीय लोकशाही दिनाकरिता दाखल प्रकरणांचा संबंधित विभागाकडून वेळेत अहवाल प्राप्त करुन प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी सर्वंकष प्रयत्न करावे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित तक्रारदारांना लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी दिले.



यावेळी लोकशाही दिनात दाखल एकूण 13 प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात डॉ. पाण्डेय यांच्या अध्यक्षतेखाली आज लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. याप्रसंगी त्या बोलत होते. अपर आयुक्त गजेंद्र बावणे, उपायुक्त संतोष कवडे यांच्यासह पोलीस, महापालिका, महसूल, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागाव्दारे सादर करण्यात आलेल्या 6 स्वीकृत अर्ज (प्रलंबित प्रकरणे) व 7 अस्वीकृत अर्ज (सामान्य तक्रार अर्ज) अशा एकूण 13 अर्जावर सविस्तर चर्चा आजच्या विभागीय लोकशाही दिनात झाली. तसेच आजच्या विभागीय लोकशाही दिनात दोन नवीन प्रकरणे दाखल झालीत.

यावेळी उपस्थित तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही विभागीय आयुक्तांनी संबंधित विभागांना यावेळी दिले.

# प्रहारचा सेवेचा वारसा निरंतर सुरू राहणार-बच्चू कडू

## आनंद सभागृह येथे प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

### 316 पिशव्या रक्त संकलन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,(दि.9) -** येथील आनंद सभागृह येथून प्रहारने पहिल्यांदा रक्तदान करून आपल्या सेवाकार्याची सुरुवात केली आणि आज लाखो रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी प्रहारच्या प्रत्येक कार्यकर्त्याने केलेली धडपड सर्वांनी याची देही याची डोळा बघितली आहे. ज्या कार्यकर्त्यांनी हजारो रक्तदान शिबीरे आयोजित केली, ज्यांनी अनेक रूग्णांचे प्राण वाचवले आज त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ रक्तदान शिबीर अयोजित करणे वेदनादायी आहे मात्र त्यांच्या आणि प्रहारच्या या सेवेचा वारसा मात्र निरंतर सुरू राहणार यात तिळमात्र शंका नाही असे प्रतिपादन प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक तथा माजी आ. बच्चू कडू यांनी आनंद सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात केले.



प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने प्रहारचे दिवंगत कार्यकर्ते स्व. ऋषभ गावंडे व स्व. सोपान कोरडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आज (दि.9 डिसेंबर) आनंद सभागृह चांदुर बाजार येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.यावेळी या रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बच्चू कडू बोलत होते.316 कार्यकर्त्यांनी या शिबिरात रक्तदान करून प्रहारच्या दिवंगत सेवकांना श्रद्धांजली अर्पण केली. प्रहार हा कुण्या नेत्यांचा पक्ष नाही तर तो कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. प्रहारचा कार्यकर्ता जोपर्यंत सेवेचा झेंडा घेऊन गोरगरीब, वंचित, दिव्यांग,कामगार आणि शेतकरी बांधवांसाठी काम करेल तोपर्यंत बच्चू कडू कार्यकर्त्यांच्या खांद्याला खांदा लावून तेवढ्याच ताकदीने काम करेल त्यामुळे आपण निवडणूक हरलो काय अन जिंकलो काय याचा आपल्याला आणि आपल्या कार्यकर्त्यांना कधीच फरक पडला नाही. आम्ही काही नसतांना सुद्धा जनतेचे काम प्राधान्याने केले आणि आजही आम्ही तेवढ्याच निष्ठेने जनतेची कामे करणार कारण सेवा भाव आमच्या रक्तात आहे असेही बच्चू कडू यावेळी म्हणाले.



प्रहारचे कार्यकर्ते स्व. ऋषभ गावंडे व स्व. सोपान कोरडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी या कार्यक्रमाचे आनंद सभागृह येथे आयोजन करण्यात आले होते. बच्चू कडू यांनी दोन्ही कार्यकर्त्यांच्या प्रतिमेला हारार्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली तसेच प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार विद्यार्गही संघटनेच्या वतीने सुद्धा श्रद्धांजली अर्पण करून दिवंगत कार्यकर्त्यांच्या आठवणींना व त्यांच्या कार्याला उजाळा दिला. संत गाडगेबाबा रक्तपेढी बडनेरा यांच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले. यावेळी असंख्य कार्यकर्ते व नागरिक या श्रद्धांजली कार्यक्रमाला उपस्थित होते.

### कार्यकर्त्यांना अश्रु अनावर

श्रद्धांजली सभेत बच्चू कडू आपल्या कार्यकर्त्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करत असतांना अनेक कार्यकर्त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला.यावेळी बच्चू कडू सुद्धा भावुक झाले होते.

### आतापर्यंत 27 मोठ्या रक्ततुला

प्रहार ने आतापर्यंत मोठ्या सत्तावीस रक्त तुला घेतलेल्या आहेत.प्रहारचा स्वत:चा 300 बॉटल रक्तदान केल्याचा रेकॉर्ड आहे,याशिवाय अण्णा हजारे, गोरा खैरनार, शहिदांच्या पत्नी, शहिदांच्या माता पिता व बच्चू कडू यांची सुद्धा रक्त तुला केल्याचा प्रहार चा रेकॉर्ड आहे.

# धामणगाव गढी आरोग्य केंद्राला मिळाली रुग्णवाहिका

## निलेश फाटकर यांच्या मागणीला यश

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,(दि.9) -** अचलपूर तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्येचा भार असलेल्या धामणगाव गढी आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका नेहमी नादुरुस्त राहत असल्याने डॉक्टरांना रुग्णांना रेफर करण्यात अडचण निर्माण झाली होती. त्यामूळे आरोग्य केंद्रास नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ता निलेश फाटकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुरेश असोले यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत आरोग्य केंद्राला नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. याचा लाभ शेकडो रुग्णांना जलदगतीने उपचार मिळण्याची सोय झाली आहे.



> जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे मागणीची दखल घेतली, त्याकरिता त्यांना धन्यवाद. नवीन रुग्णवाहिकेमूळे रुग्णांना सोय होईल.
>
> **निलेश फाटकर, धामणगाव गढी**

आरोग्य सेवेवर दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात येते, तरी सुद्धा सुविधांची बोंबाबोंब पाहायला मिळते. अचलपूर तालुक्यातील धामणगाव गढी प्राथमिक आरोग्य केंद्रातील हजारो रुग्णाचे जीव वाचवणारी रुग्णवाहिका मागील काही वर्षांपासून आजारी होती. त्यामुळे गोरगरीब जनतेला आर्थिक फटका बसत होता. सोबत मानसिक त्रास सहन करावा लागत होता. या ठिकाणी उपलब्ध असलेल्या दोन्ही रुग्णवाहिका पैकी एक रुग्णवाहिका नादुरुस्त होती तर दुसरी रुग्णवाहिका उपकेंद्रात असून ती सुद्धा नादुरुस्त होवून बंद पडण्याच्या मार्गावर होती. त्यामुळे या आरोग्य केंद्राचा कारभार 108 आणि उपकेंद्राअंतर्गत असलेल्या रुग्णवाहिकेच्या भरवश्यावर सुरू होता. ज्यामुळे रुग्णवाहिका येईपर्यंत रुग्णांना ताटकळत बसावे लागत होते, याचा सर्वाधिक त्रास आदिवासी रुग्णांना होत होता. मात्र या गंभीर बाबीकडे लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष होत होते. करिता आरोग्य केंद्रात रुग्णांचा वाढता भार पाहता या ठिकाणी नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची मागणी धामणगाव गढी येथील सामाजिक कार्यकर्ता निलेश फाटकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे केली होती. ज्याची दखल घेत आरोग्य केंद्राला नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे.